**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल केलेली तक्रार**

**क्र. : मुमाआ/नों. क्र. ३५१/२२/त. क्र. १२/२३/०१**

**श्री. सुहास शंकर नरवणकर**
घर-दुकान क्र.०६, जय भवानी शितपेय,
व जनरल स्टोअर्स आणि कम्युनिकेशन सेंटर,
ई.क्र. (स.शि.)३२ च्या समोर, नेरुळ बस स्टॉपच्या मागे,
भारगत नगर, मानखुर्द, मुंबई ४०००८८.

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी एम/पुर्व विभाग**
एम/पूर्व विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त,
एम-पूर्व यांचे कार्यालय, पहिला मजला, म.तु.कदम मार्ग, गोवंडी, मुंबई ४०० ०४३.

**प्रथम अपिलिय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त एम/पुर्व विभाग**
एम/पूर्व विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त,
एम-पूर्व यांचे कार्यालय, पहिला मजला, म.तु.कदम मार्ग, गोवंडी, मुंबई ४०० ०४३.

| | | |
|---|---|---|
| **तक्रारीचा दिनांक** | : | ०५.०४.२०२२ |
| **सुनावणीचा दिनांक** | : | **०६.०१.२०२३/२४.०३.२०२३** |
| तक्रारदार | : | अनुपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

**उक्त प्रकरणी दिनांक ०६.०१.२०२३ रोजी आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:**

तक्रारदार यांनी दि.२४.०७.२०१९ रोजी दाखल केलेल्या द्वितीय अपीलाबाबत अपील क्र.मुमाआ / नों.क्र.३८५५/१९/अ.क्र.३५४/२२/०१ नुसार मातोश्री झुणका भाकर केंद्र, मानखुर्द रेल्वे स्टेशन जवळ येथे हा केंद्र कमलेश छेदिलाल गुप्ता हया भाडयाने दिलेला आहे. हया झुणका भाकर केंद्राला आपल्या विभागातून लायसन्स दिलेला आहे का ? दिला असेल तर केव्हा दिलेला आहे ? व इतर बाबत माहिती मागितलेली असून राज्य माहिती आयोगाने दि.१६.०३.२०२२ रोजीच्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.हरिष नौनी यांना असे आदेश देण्यात आले आहेत की, त्यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलकर्ता यांना ७ दिवसात स्पीड पोस्टने नि:शुल्क पाठविण्यात यावी.

तथापि तक्रारकर्त्यांना अद्याप माहिती मिळाली नसल्याने तक्रारदार यांनी दि.०५.०४.२०२२ रोजी आयोगापुढे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे.

तक्रारदार यांनी त्यांच्या दि:१२/०३/२०१८ रोजीच्या मूळ माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती अद्याप तक्रारदार यांना मिळालेली नसल्याचे सांगितले.

आजच्या तक्रारीच्या सुनावणीस तक्रारदार, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सबब, तक्रारीची सुनावणी तहकूब करण्यात येत आहे. सदर तक्रारीची **पुनर्सुनावणी दिनांक १७.०३.२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता** आयोगात प्रत्यक्ष आयोजित करण्यात येत आहे. तक्रारदार, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पुढील सुनावणीस उपस्थित राहावे. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील.

आजच्या पुनर्सुनावणीस तक्रारकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित आहे.

यास्तव तक्रारीची सुनावणी तहकूब करण्यात येत आहे. सदर **तक्रारीची पुनर्सुनावणी दिनांक ०५.०४.२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता** आयोगात प्रत्यक्ष आयोजित करण्यात येत आहे. तरी तक्रारकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी स्वत: माहितीसह उपस्थित राहावे. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील.

State Information Commission ★ Maharashtra ★

**मुंबई**
**दिनांक : २४.०३.२०२३**

**(सुमित मल्लिक)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

*Pragati 24.03.2023*